**स्थानिक संस्था कर अभय योजना**
**२०१५ घोषित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : स्थांसक — २०१५/प्र.क्र. ८२/२०१५ नवि-३२**
**मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२**
**दि. ०३ जून, २०१५**

**शासन निर्णय :-** सोबतची शासकीय अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग यामध्ये मराठी व नंतर इंग्रजी अशा रितीने दि.०३ जून, २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**गो. आ. लोखंडे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) व्यवस्थापक, शासकिय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४ त्यांना विनंती करण्यात येते की, शासन निर्णयाप्रमाणे अधिसुचना शासनाच्या असाधारण राजपत्रात भाग-एक-अ, उपविभागामध्ये प्रसिध्द करून त्याच्या प्रती खालील सर्व संबंधितांना पाठवाव्यात आणि १०० प्रती या विभागास पाठवाव्यात.

२) सर्व आयुक्त, महानगरपालिका (प्रत्येकी ५० प्रती)

३) निवड नस्ती नवि-३२, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१. या योजनेला स्थानिक संस्था कर अभय योजना, २०१५ असे म्हणावे.

२. सदर योजना दि. ०३ जून, २०१५ पासून अंमलात येईल.

# अधिसूचना

**नगर विकास विभाग,**
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दि. ०३ जून, २०१५.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम**

क्रमांक. स्थासंक-२०१५/प्र.क्र. ८२/२०१५ नवि-३२ - **ज्याअर्थी,** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,(१९४९ चा मुंबई ५९) याच्या कलम १२७ च्या पोट-कलम (२) च्या खंड (अअअ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने उपभोग, उपयोग किंवा विक्री यांसाठी शहराच्या हद्दीमध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर महानगरपालिकांनी जकात किंवा उपकर यांचे ऐवजी टप्प्याटप्प्याने स्थानिक संस्था कर बसवावा असे त्यांना निदेश दिलेले आहेत.

**आणि ज्याअर्थी,** मुंबई महानगरपालिका वगळता राज्यातील उर्वरित २५ महानगरपालिकांमध्ये जकाती ऐवजी स्थानिक संस्था कराची अंमलबजावणी सुरु आहे आणि विविध कारणांमुळे काही व्यापाऱ्यांकडूनमहानगरपालिकेला स्थानिक संस्था कराचा भरणा न केला गेल्यामुळे महानगरपालिकांचा मोठ्या प्रमाणात महसूल अडकलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाचे असे मत झाले आहे की, प्रलंबित असलेली स्थानिक संस्था कराची रक्कम वसूल करण्याकरिता २५ महानगरपालिका क्षेत्रामध्ये व्याज व दंड माफीची अभय योजना घोषित करणे आवश्यक आहे ;

**त्याअर्थी,** आता महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१५ मधील नियम ४८ (९) (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे व्याज व दंड माफी करिता पुढीलप्रमाणे स्थानिक संस्था कर अभय योजना, २०१५ अधिसूचित करीत आहे,

१. **संक्षिप्त नांव :-**

१. या योजनेला स्थानिक संस्था कर अभय योजना, २०१५ असे म्हणावे.

२. सदर योजना दि. ०३ जून, २०१५ पासून अंमलात येईल.

२. **स्थानिक संस्था कर अभय योजना, २०१५**

स्थानिक संस्था कर अभय योजना, २०१५ ही नोंदणीकृत तसेच बिगर नोंदणीकृत (व्यापा-याने किंवा व्यक्तीने अभय योजनेच्या विहीत मुदतीत त्याची स्वत:ची नोंदणी केल्यास) व्यापाऱ्यांना किंवा व्यक्तींना लागू असेल. ही योजना संबंधित महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक संस्था कर लागू झाला त्या दिनांकापासून ३१ मार्च २०१५ पर्यंतच्या संपूर्ण कालावधीसाठी लागू असेल. ही अभय योजना निर्धारणा पूर्ण झालेल्या व निर्धारणा न केलेल्या अशा कालावधीसाठी लागू असेल. या योजनेअंतर्गत व्यापारी अथवा व्यक्तीने संबंधित महानगरपालिकेला देय असलेल्या स्थानिक संस्था कराच्या थकबाकीपैकी, मूळ कराची संपूर्ण रक्कम ३ जून २०१५ ते ३१ जुलै २०१५ या कालावधीत भरल्यास, त्यांना संपूर्ण व्याज व दंड माफ केला जाईल.

संबंधित व्यापारी/उद्योग घटकाने थकित मूळ रकमेचा अंशत: भरणा केल्यास, भरणा केलेल्या कराच्या प्रमाणात व्याज व दंडाची माफी देण्यात येईल आणि न भरलेला कर, व्याज व दंडासह वसूल करण्यात येईल.

**३. अभय योजनेची ठळक वैशिष्टये**

१. व्यापा-याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी संपणाऱ्या कोणत्याही कालावधीकरिता (दि. ३१ जुलै, २०१५ पूर्वी) निर्धारण पुर्नविलोकन यामध्ये देण्यात आलेल्या सांविधिक अपील आदेशानुसार देय असलेल्या थकबाकीपैकी व्यापाऱ्याने मूळ कराची रक्कम संपूर्ण भरल्यास व्याज व दंड माफ करण्यात येईल.

२. जर व्यापा-याने अपील दाखल केले असेल आणि निर्धारणा आदेशानुसार मुळ कराची रक्कम भरली असेल तर विना शर्त अपील मागे घेण्याच्या अटीवर या योजनेअंतर्गत दंड व व्याज माफ करण्यात येईल.

३. व्यापाऱ्याने विवरण दाखल केलेले नसेल आणि जर त्याने अभय योजनेच्या काळात विवरण दाखल करुन देय असलेल्या संपूर्ण कराचा भरणा केला तर व्याज व दंडाची आकारणी करण्यात येणार नाही. व्यापाऱ्याने विवरण अगोदरच दाखल केलेले असेल आणि जर त्याने पूर्वीच सुधारित विवरण दाखल करुन अतिरिक्त करदायित्व मान्य केले असेल व त्या संपूर्ण कराचा भरणा केला असेल तर, व्याज व दंडाची आकारणी करण्यात येणार नाही.

४. व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने अभय योजना सुरु होण्यापूर्वी विवरणानुसार संपूर्ण कराचा भरणा केला असल्यास अशा उशिरा भरलेल्या कराच्या प्रदानावर व्याज व दंडाची आकारणी करण्यात येणार नाही.

५. अभय योजनेचा परिणाम म्हणून कोणताही परतावा देता येणार नाही.

६. अभय योजना, २०१५ च्या उकलीबाबत कोणतीही अडचण उद्भवल्यास, योजनेच्या तरतुदींची अंतिमत: अर्थउकल करण्याचे अधिकार शासनाकडे असतील.

७. अभय योजनेखाली १०% व्यापा-यांची रॅन्डम पध्दतीने कर निर्धारणा करण्यात येईल.

८. सदरहू १०% व्यापा-यांची निर्धारणा ही प्युअरली रॅन्डम पध्दतीने करण्याचे सर्व अधिकार हे महानगरपालिका आयुक्तांना असतील व त्यांना हे अधिकार त्यांच्या अधिनस्त असलेल्या अधिका-यांना देता येणार नाही.

९. अभय योजनेअंतर्गत सर्व कर निर्धारणा ही ३१ डिसेंबर २०१५ पूर्वी पूर्ण करण्यात येईल. आणि त्या नंतर करदात्यावर व्याज व दंडाचे दायीत्व राहणार नाही.

१०. व्यापा-यांची निर्धारणा करताना व्यापा-यांनी विवरण पत्रानुसार भरलेला कर व निर्धारणेअंती निश्चित झालेली कर देयता या मध्ये जर १०% पेक्षा अधिक फरक येत नसेल तर अशा वाढीव रकमेवर कोणतेही व्याज व दंड आकारता येणार नाही.

११. योजना घोषित झाल्यानंतर संबंधित महानगरपालिका आयुक्त सदरहू योजनेची माहिती व्यापा-यांना देण्याकरीता कार्यशाळेचे आयोजन करतील व सदरहू योजनेचे फायदे व्यापा-यांना समजावून सांगतील.

**अभय योजनेतील सवलतीचा लाभ घेण्यासाठीच्या अटी व शर्ती**

१. ज्या व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था करांतर्गत अद्याप नोंदणी केलेली नसेल अशा व्यापाऱ्यांनी किंवा व्यक्तींनी प्रथम नोंदणी करणे आवश्यक आहे.

२. त्यांनी करदायित्व ज्या दिनांकास आले त्या दिनांकापासून ३१ मार्च २०१५ पर्यंतची विवरणे दाखल करुन त्यानुसार करभरणा करणे आवश्यक आहे.

३. अभय योजनेचा लाभ घेतल्यानंतर जर अपील पुनर्विलोकन किंवा रिट याचिका दाखल केली गेली तर, अभय योजनेअनुसार संबंधित कालावधीसाठी दिलेल्या सवलती काढून घेण्यात येतील.

२. **<u>स्थानिक संस्था कर अभय योजना, २०१५</u>**

स्थानिक संस्था कर अभय योजना, २०१५ ही नोंदणीकृत तसेच बिगर नोंदणीकृत (व्यापा-याने किंवा व्यक्तीने अभय योजनेच्या विहीत मुदतीत त्याची स्वत:ची नोंदणी केल्यास) व्यापाऱ्यांना किंवा व्यक्तींना लागू असेल. ही योजना संबंधित महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक संस्था कर लागू झाला त्या दिनांकापासून ३१ मार्च २०१५ पर्यंतच्या संपूर्ण कालावधीसाठी लागू असेल. ही अभय योजना निर्धारणा पूर्ण झालेल्या व निर्धारणा न केलेल्या अशा कालावधीसाठी लागू असेल. या योजनेअंतर्गत व्यापारी अथवा व्यक्तीने संबंधित महानगरपालिकेला देय असलेल्या स्थानिक संस्था कराच्या थकबाकीपैकी, मूळ कराची संपूर्ण रक्कम ३ जून २०१५ ते ३१ जुलै २०१५ या कालावधीत भरल्यास, त्यांना संपूर्ण व्याज व दंड माफ केला जाईल.

संबंधित व्यापारी/उद्योग घटकाने थकित मूळ रकमेचा अंशत: भरणा केल्यास, भरणा केलेल्या कराच्या प्रमाणात व्याज व दंडाची माफी देण्यात येईल आणि न भरलेला कर, व्याज व दंडासह वसूल करण्यात येईल.

**<u>३. अभय योजनेची ठळक वैशिष्टये</u>**

१. व्यापा-याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी संपणाऱ्या कोणत्याही कालावधीकरिता (दि. ३१ जुलै, २०१५ पूर्वी) निर्धारण पुर्नविलोकन यामध्ये देण्यात आलेल्या सांविधिक अपील आदेशानुसार देय असलेल्या थकबाकीपैकी व्यापाऱ्याने मूळ कराची रक्कम संपूर्ण भरल्यास व्याज व दंड माफ करण्यात येईल.

२. जर व्यापा-याने अपील दाखल केले असेल आणि निर्धारणा आदेशानुसार मुळ कराची रक्कम भरली असेल तर विना शर्त अपील मागे घेण्याच्या अटीवर या योजनेअंतर्गत दंड व व्याज माफ करण्यात येईल.

३. व्यापाऱ्याने विवरण दाखल केलेले नसेल आणि जर त्याने अभय योजनेच्या काळात विवरण दाखल करुन देय असलेल्या संपूर्ण कराचा भरणा केला तर व्याज व दंडाची आकारणी करण्यात येणार नाही. व्यापाऱ्याने विवरण अगोदरच दाखल केलेले असेल आणि जर त्याने पूर्वीच सुधारित विवरण दाखल करुन अतिरिक्त करदायित्व मान्य केले असेल व त्या संपूर्ण कराचा भरणा केला असेल तर, व्याज व दंडाची आकारणी करण्यात येणार नाही.

४. व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने अभय योजना सुरु होण्यापूर्वी विवरणानुसार संपूर्ण कराचा भरणा केला असल्यास अशा उशिरा भरलेल्या कराच्या प्रदानावर व्याज व दंडाची आकारणी करण्यात येणार नाही.

५. अभय योजनेचा परिणाम म्हणून कोणताही परतावा देता येणार नाही.

६. अभय योजना, २०१५ च्या उकलीबाबत कोणतीही अडचण उद्भवल्यास, योजनेच्या तरतुदींची अंतिमत: अर्थउकल करण्याचे अधिकार शासनाकडे असतील.

७. अभय योजनेखाली १०% व्यापा-यांची रॅन्डम पध्दतीने कर निर्धारणा करण्यात येईल.

८. सदरहू १०% व्यापा-यांची निर्धारणा ही प्युअरली रॅन्डम पध्दतीने करण्याचे सर्व अधिकार हे महानगरपालिका आयुक्तांना असतील व त्यांना हे अधिकार त्यांच्या अधिनस्त असलेल्या अधिका-यांना देता येणार नाही.

९. अभय योजनेअंतर्गत सर्व कर निर्धारणा ही ३१ डिसेंबर २०१५ पूर्वी पूर्ण करण्यात येईल. आणि त्या नंतर करदात्यावर व्याज व दंडाचे दायीत्व राहणार नाही.

१०. व्यापा-यांची निर्धारणा करताना व्यापा-यांनी विवरण पत्रानुसार भरलेला कर व निर्धारणेअंती निश्चित झालेली कर देयता या मध्ये जर १०% पेक्षा अधिक फरक येत नसेल तर अशा वाढीव रकमेवर कोणतेही व्याज व दंड आकारता येणार नाही.

११. योजना घोषित झाल्यानंतर संबंधित महानगरपालिका आयुक्त सदरहू योजनेची माहिती व्यापा-यांना देण्याकरीता कार्यशाळेचे आयोजन करतील व सदरहू योजनेचे फायदे व्यापा-यांना समजावून सांगतील.

**<u>अभय योजनेतील सवलतीचा लाभ घेण्यासाठीच्या अटी व शर्ती</u>**

१. ज्या व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था करांतर्गत अद्याप नोंदणी केलेली नसेल अशा व्यापाऱ्यांनी किंवा व्यक्तींनी प्रथम नोंदणी करणे आवश्यक आहे.

२. त्यांनी करदायित्व ज्या दिनांकास आले त्या दिनांकापासून ३१ मार्च २०१५ पर्यंतची विवरणे दाखल करुन त्यानुसार करभरणा करणे आवश्यक आहे.

३. अभय योजनेचा लाभ घेतल्यानंतर जर अपील पुनर्विलोकन किंवा रिट याचिका दाखल केली गेली तर, अभय योजनेअनुसार संबंधित कालावधीसाठी दिलेल्या सवलती काढून घेण्यात येतील.

४. अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक वर्षाकरिता स्वतंत्रपणे आवेदनपत्र महानगरपालिका आयुक्तांकडे सादर करणे आवश्यक असेल.

५. व्यापा-याने जर अपील दाखल केले असेल तर तो असे अपील विनाशर्त मागे घेईल व त्याबद्दलचा पुरावा आवेदन पत्रासोबत जोडेल.

६. अभय योजनेखाली कर भरावयाची शेवटची तारीख :- ३१ जुलै, २०१५

**स्पष्टिकरण:-** पात्र व्यापा-याने किंवा व्यक्तीने दिनांक ३१.०७.२०१५ नंतर विवरण दाखल करून कर भरणा केल्यास त्याचा विचार या विशेष अभय योजनेअंतर्गत केला जाणार नाही.

सदर योजनेचा लाभ घेण्याकरिता संबंधित व्यापा-याने किंवा व्यक्तीने या अधिसुचनेसोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात महानगरपालिकेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**गो. आ. लोखंडे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

# <u>स्थानिक संस्था कर अभय योजना चलन/अर्जाचा नमुना</u>

१. अर्जदाराचे नांव/पत्ता/दूरध्वनी क्रमांक/ई-मेल आयडी ----------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

२. व्यापारी फर्मचे नांव व पत्ता ----------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

३. व्यवसायाचे स्वरुप ------------------------------------------------------------------------
(उत्पादक/विक्रेता/इतर नमूद करावे)

४. नोंदणी केली असल्यास त्याबाबतचा तपशील -------------------------------------------

५. कोणत्या कालावधीसाठी अभय योजनेचा लाभ घ्यावयाचा आहे ते वित्तीय वर्ष -------
------------------------------------------------------------------------------------------------

६. स्थानिक संस्था कराची थकबाकी भरल्याबाबतचा पुरावा म्हणून चलनाची प्रत
(प्रत संलग्न करावी) -------------------------------------------------------------------------

उपरोक्त चलन/अर्जामध्ये मी दिलेली सर्व माहिती अचूक असून पडताळणीअंती ती चुकीची/असत्य आढळून आल्यास अभय योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या सवलती काढून घेण्यास मी पात्र ठरेल याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :-**

**दिनांक : -**

**अर्जदाराची सही**
**(नाव व पदनाम)**

**<u>सहपत्र -:</u>**

**१. वैधानिक आदेशाची प्रत**
**२. करभरणा केलेल्या चलनाची प्रत**
**३. कर निर्धारणा झाली नाही अशा प्रकरणातील विवरणपत्र/सुधारीत विवरणपत्राची प्रत**
**४. अपिल मागे घेतले असल्याची प्रत**

# NOTIFICATION

Urban Development Departme,

Hutatma Rajguru Chowk;
Madam Cama Marg;
Mantralaya, Mumbai – 400 032;
Dated - the 3rd June, 2015.

**Maharashtra Municipal Corporations Act**

No. [LBT- 2015/CR-82/2015/UD-32]. – Whereas, in exercise of the powers conferred by clause (aaa) of sub-section (2) of section 127 of Maharashtra Municipal Corporations Act LIX of 1949, The Government of Maharashtra has directed Municipal Corporations that they shall levy the Local Body Tax on entry of the goods into the limits of the city for consumption, use or sale therein, in lieu of octroi or cess in phase wise manner.

And whereas, Local Body Tax is being implemented in twenty five Municipal Corporations in the State instead of octroi; and whereas it is observed that for various reasons some traders have not paid Local Body Tax to the Corporation due to which Corporations revenue has been blocked in large scale.

And whereas, now The Government is of the opinion that for the recovery of pending Local Body Tax it is necessary to declare Amnesty Scheme for waiver of interest and penalty in twenty five Municipal Corporations area.

Now therefore in exercise of the powers conferred under clause (a) of sub-rule (9) of rule 48 of Maharashtra Municipal Corporations (Local Body Tax) Amendment rules 2015, the Government of Maharashtra hereby notifies the following Local Body Tax Amnesty Scheme 2015 for waiver of interest and penalty, namely :-

1. **Short Title.**

(I) This scheme may be called The Maharashtra Municipal Corporations Local Body Tax Amnesty Scheme 2015.

S-G

(II) This Scheme shall come into force from 3rd June 2015.

2. **Applicability of the Local Body Tax Amnesty Scheme, 2015**

This scheme shall be applicable to the registered as well as non-registered (if trader or person registers himself during the prescribed time period of Amnesty Scheme) trader or person and for temporary registered person or trader for specific year. The scheme shall be applicable for the total period starting from date of implementation of Local Body Tax in the Corporation to 31st March, 2015.

The Scheme shall be applicable for assessed period as well as for un-assessed period. Under the scheme, if trader or person pays total amount of principal tax payable by him to respective corporation during the amnesty period of 3rd June, 2015 to 31st July, 2015 out of pending dues then the total amount of interest or penalty shall be waived.

If respective trader or person pays part of outstanding principal amount of tax then in respect of only tax paid amount interest and penalty shall be waived and the balance tax which is not paid shall be recovered with interest and penalty.

3. **Salient features of the Amnesty Scheme**

**(i)** If trader pays total principal tax amount out of pending dues payable as per any statutory order passed before 31st May, 2015 for any period ending on 31st March, 2015 under Maharashtra Municipal Corporations Act then interest and penalty shall be waived.

**(ii)** If trader is in appeal and if amount of principal tax out of outstanding dues is paid as per assessment order then interest and penalty shall be waived under the scheme, subject to unconditional withdrawal of appeal.

**(iii)** If return is not filed by trader and if he files returns and pays total amount of tax during the amnesty period then interest and penalty shall not be levied. If trader has already furnished retunes and by furnishing

revised return he accepts additional tax liability and pays the total amount of tax then interest and penalty shall not be levied.

**(iv)** If traders or person has already paid total amount of tax as per returns before the coming in to force of the Amnesty Scheme then interest or penalty shall not be levied on such late payment of tax.

**(v)** No refund shall be granted as result of this amnesty scheme.

**(vi)** If there is any doubt regarding interpretation of Amnesty Scheme then interpretation of the Government shall be final.

**(vii) There will be 10% random assessment of traders under amnesty scheme.**

**(viii) Selection of 10% traders for assessment will be done randomly by the commissioner and this power can't be delegated to subordinate officers.**

**(ix) All the assessment under amnesty will be completed by the end of 31st December 2015 and then there after there will be no tax, interest or penalty liability on the traders.**

**(x) If there is 10% variation in tax liability at the time of the assessment compare to the return file by the trader then on such amount no interest or penalty will be levied.**

**(xi) After the declaration of the scheme the Municipal Commissioner will arrange workshop for trade and industry for making them aware about the benefit of the scheme.**

## Terms And Conditions for availing benefit of Amnesty Scheme

**(i)** Trader or Person who are not registered on the date of this notification under Local Body Tax then such trader or person will have to get registered first.

**(ii)** Trader or Person shall file all returns from the date of tax liability to 31st March, 2015 and pay tax accordingly.

**(iii)** After availing benefits of the scheme if appeal, review application or writ petition is filed then the benefits given under the scheme shall be withdrawn.

**(iv)** For availing benefits under the amnesty scheme application shall be submitted to the Municipal Commissioner, separately for each year.

**(v)** If the dealer or person is in appeal then he shall withdraw appeal unconditionally and submit proof of unconditional withdrawal of appeal along with application.

**(vi)** Last date of paying tax under the scheme is 31st July, 2015.

Explanation - for the removal of doubt it is hereby declared that any trader or person, shall not be eligible to claim benefits under the scheme if he files returns and pay tax after 31st July, 2015.

To avail the benefit under the scheme the applicant shall submit an application in prescribed form appended to this notification to the Municipal Corporation.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**G. A. Lokhande**
**Deputy Secretary to Government**

# Amnesty Challan/Application Form

1) Name, and address phone No. and email of the Applicant :-

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

2) Name/ address of the Business firm : -

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

3) Nature of Business------------------------------------------------------------

(Manufacturer/Reseller /Others, specify)

4) Registration No.(If registered)----------------------------------------------

5) For which financial year intends to take benefit

of the Amnesty Scheme-----------------------------------------------------

6) A copy of the Challan is enclosed as a proof of payment of LBT

-------------------------------------- Yes/No

Information given by me in above challan /application is correct and true to the best of my knowledge and I know that if on scrutiny of my application any information given by me is found to be false/untrue then benefits given under the scheme shall be withdrawn.

Place-

Date-

**Signature of applicant**
(Name and designation)

**Enclosed**

i) Copy of statuary order passed.
ii) Copy of Challan of tax payment.
iii) Copy of return/revised return in case of unassessed period.
iv) Copy of withdrawal of appeal, if any.